# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावरील वैद्यकिय अधिकारी, स्टाफनर्स व ए.एम.एन. करीता
## जाहिरात

नाशिक महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत खालील पदे मानधन पध्दतीने भरण्यासाठी अर्हताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. किमान शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या संबंधित उमेदवारांनी आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्रासह जाहिरात/संकेतस्थळावरील विहित नमुन्यातील अर्ज डाऊनलोड करुन व्यवस्थित भरून सर्व आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा.

मुदतीत प्राप्त अर्जाची छाननी करुन मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी मनपाच्या नोटीस बोर्डवर तसेच मनपाच्या https:\\nmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. मुलाखती अंती निवड उमेदवारांची यादी मनपाच्या नोटीसबोर्ड वर व मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. मुलाखतीनंतर पात्र उमेदवारांना स्वंतत्ररित्या कळविणेत येणार नाही.

**<u>अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :-</u>** सार्वजनिक वैद्यकिय विभाग, 3 रा मजला. राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक
अर्ज कार्यालयीन सुटटी व सार्वजनिक सुटटी वगळून सकाळी 10.00 ते 5.00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.
**<u>अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख व वेळ :-</u> 26/10/2023 सायं 5.00 वाजेपर्यंत.**
**<u>टीप:-</u>** 26/10/2023 सायं 5.00 वाजेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**<u>पात्र उमेदवारांकरीता मुलाखतीची दिनांक व वेळ :-</u>**

1. अ.क्र. 1 ते 10 दिनांक: 07 / 11 / 2023 रोजी सकाळी 10.00 वाजता.
2. अ.क्र. 11 करीता दिनांक: 08/ 11 / 2023 रोजी सकाळी 10.00 वाजता.

मानधनावर भरावयाची पदे, पदांची किमान शैक्षणिक अर्हता, संख्या व एकत्रित दरमहा मानधन खालीलप्रमाणे-

| अ. क्र. | पदनाम | किमान शैक्षणिक अर्हता | एकूण पदसंख्या | एकत्रित दरमहा मानधन |
|---|---|---|---|---|
| 1. | शल्यचिकित्सक (General Surgeon) | M.S/ D.N.B./ F.C.P.S. in Gen Surgery | 2 | 75000 |
| 2. | वैद्यक शास्त्र तज्ञ (Physician) | M.D/ D.N.B./ F.C.P.S. in General Medicine | 4 | 75000 |
| 3. | स्त्रीरोग तज्ञ (Gynecologist) | MD/MS (OBGY)/ D.N.B. (OBGY) /D.G.O. | 5 | 75000 |
| 4. | बालरोग तज्ञ (Pediatrician) | M.D. /D.N.B. /Diploma in Pediatrics. | 5 | 75000 |
| 5. | क्ष किरण तज्ञ (Radiologist) | M.D. /D.N.B. /Diploma in Radiology. | 2 | 75000 |
| 6. | बधिरीकरण तज्ञ (Anesthetist) | M.D. /D.N.B. /Diploma in Anesthesia | 2 | 75000 |
| 7. | नाक कान घसा तज्ञ (ENT Specialist) | M.S. /D.N.B. /Diploma in ENT | 2 | 75000 |
| 8. | मानसोपचार तज्ञ (Psychiatrist) | M.D. /D.N.B. /Diploma in Psychiatry | 1 | 75000 |
| 9. | दंतशल्य चिकित्सक (Dentist) | B.D.S. | 3 | 30000 |
| 10. | पुर्णवेळ वैद्यकिय अधिकारी | M.B.B.S. | 10 | 60000 |
| 11. | आयुष वैद्यकिय अधिकारी | B.A.M.S. | 20 | 40000 |
| 12. | स्टाफनर्स | B.Sc. Nursing/GNM | 20 | 20000 |
| 13. | ए.एन.एम. | ANM | 20 | 18000 |

### अटी व शर्ती :-

1. शासकीय/निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थेकडील / खाजगी रुग्णालयातील संबंधित विषयातील 3 वर्षाचा अनुभवास प्राधान्य. (अनुभव प्रमाणपत्र आवश्यक)
2. अ.क्र. 1 ते 11 पदांकरिता कमाल वयोमर्यादा 70 वर्षापर्यंत राहील. वय वर्ष 60 नंतरच्या प्रत्येक वर्षी जिल्हा शल्य चिकित्स्क यांचेकडून शारिरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र बंधनकारक. व महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलकडील नोंदणी व नूतनीकरण आवश्यक.
3. अ.क्र. 12 व 13 पदांकरिता कमाल वयोमर्यादा 65 वर्षापर्यंत राहील व महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडील नोंदणी व नूतनीकरण आवश्यक.
4. सदरची निवड आयुक्त्, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र राज्य यांचे मार्गदर्शक सुचना नुसार करण्यात येईल.
5. सदरील पदांचा मनपा, नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेशी कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.
6. सदरील पदे ही निव्वळ मानधनावर भरावयाची आहेत. सुरुवातीस निवड झालेल्या उमेदवारांना प्रथमत: 6 महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात कामाचे आदेश दिले जातील. तसेच त्यानंतर सदर उमेदवारांची आवश्यकता असल्यास सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने पुढील कामाचे आदेश दिले जातील.
7. मुलाखतीस पात्र उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रे व सर्व प्रमाणपत्रांची साक्षांकित सत्यप्रतींसह मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे.
   - पासपोर्ट साईज फोटो-2, वयाच्या दाखल्याकरीता :- 10 वीचे टी.सी./जन्म् प्रमाणपत्र, फोटो आय.डी. :-मतदान ओळखपत्र/आधारकार्ड इ. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र:- शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका, कौन्सिलकडील नोंदणी प्रमाणपत्र, सदर नोंदणीचे नुतनीकरण पत्र, डिग्री सर्टिफिकेट, अनुभव प्रमाणपत्र, मुलाखतीच्या अनुषंगाने इतर कागदपत्रे मुळ व सत्यप्रत साक्षांकित प्रत.

8. अर्ज छाननी अंती पात्र असणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी प्रवेश देण्यात येईल.
9. अ.क्र. 1 ते 11 पदांकरिता पात्रतेसाठी एकूण 100 गुण असतील व त्यांची विभागणी खालीलप्रमाणे असेल.

| अ.क्र. | तपशिल | गुण |
|---|---|---|
| 1. | पदवी/पदव्युत्तर पदवीका/पदव्युत्तर पदवी शेवटच्या वर्षाच्या गुणानुसार | 50 गुण |
| 2. | Subject Knowledge | 10 गुण |
| 3. | Research & Academic Knowledge | 10 गुण |
| 4. | Leadership Quality | 10 गुण |
| 5. | Administrative Abilities | 10 गुण |
| 6. | Experience | 10 गुण |
| | **एकूण गुण-** | **100 गुण** |

10. अ.क्र. 12 ते 13 पदांकरिता पात्रतेसाठी एकूण 100 गुण असतील व त्यांची विभागणी खालीलप्रमाणे असेल.

| विवरण | तपशिल | गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Quality exam मधील गुण (अंतिम वर्षीच्या गुणाच्या आधारे ) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे 50 प्रमाणे proportion काढावे (उदा.60% गुण प्राप्त असल्यास त्याचे 50% प्रमाणे proportion = 60*50/100=30) | 50 गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता) असल्यास विचारत घ्यावी | अधिकतम 20 गुण द्यावेत.<br>मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे 20 प्रमाणे proportion काढावे<br>(उदा. स्टाफ नर्स पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करून अतिरिक्त BSc. Nursing शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवारास BSc. Nursing च्या अंतिम वर्षात 60% गुण प्राप्त असल्यास त्याचे 20% प्रमाणे proportion = 60*20/100=12) | जास्तीत जास्त् 20 गुण |
| संबंधीत पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक 1 वर्षासाठी 6 गुण द्यावेत. | जास्तीत जास्त् 30 गुण |
| | **एकूण गुण-** | **100 गुण** |

11. उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवार यांना प्राधान्य देणेत येईल.
12. उमेदवारांचे अर्ज जास्त संख्येने असल्यास 1:3 याप्रमाणे उमेदवार बोलविण्यात येतील.
13. उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.
14. नियुक्तीबाबतचा अंतिम अधिकार आयुक्त्, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी राखून ठेवला आहे.

**sd/-**
**आयुक्त तथा प्रशासक**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

# अर्ज

प्रति,
मा. आयुक्त सो.,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

फोटो

1. **पदाचे नांव** :- ---------------------------------------------------
2. **उमेदवाराचे संपुर्ण नांव** :- ---------------------------------------------------
3. **पत्र व्यवहाराचा पत्ता** :- --------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------

4. **भ्रमणध्वनी** :- ----------------------------------------
5. **ईमेल आय.डी.** :- ----------------------------------------
6. **जन्मतारीख** :- -------------------------------------**वय** (दि.31/10/2023 रोजीचे वय) :- -------
7. **लिंग** :- स्त्री / पुरूष
8. **शैक्षणिक पात्रता**

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | परिक्षा मंडळ / विद्यापिठाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | शेवटच्या वर्षाचे प्राप्त गुण व एकुण गुण |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |
| 4. | | | | |

9. **अनुभव**:- असल्यास तपशील व कालावधी देणे

| अ.क्र. | काम केलेल्या संस्थेचे नांव | कालावधी वर्षामध्ये | कामाचे पद |
|---|---|---|---|
| 1. | | | |
| 2. | | | |
| 3. | | | |
| 4. | | | |
| 5. | | | |

10. **अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे :-**

| अ.क्र. | कागदपत्रे | आहे/ नाही | अ.क्र. | कागदपत्रे | आहे/ नाही |
|---|---|---|---|---|---|
| 1) | आधार कार्ड / ओळख पत्र | | 5) | ॲडिशनल डीग्री सर्टीफिकेट | |
| 2) | जन्म दाखला किंवा वयाचा दाखला | | 6) | ॲडिशनल डीग्री सर्टीफिकेट चे एम.एम.सी. नोंदणी प्रमाणपत्र | |
| 3) | डीग्री सर्टीफिकेट | | 7) | एम.एम.सी. नोंदणी प्रमाणपत्र चे नुतनीकरण प्रमाणपत्र | |
| 4) | डीग्री सर्टीफिकेट चे एम.एम.सी. नोंदणी प्रमाणपत्र | | 8) | अनुभव प्रमाणपत्र (नसल्यास नियुक्ती आदेश व कार्यमुक्त आदेश दोन्ही बंधनकारक) | |

ठिकाण :-
दिनांक :- / /2023

उमेदवाराची स्वाक्षरी